
ISSN 2320 - 4494
RNI No. MAHAUL03008/13/1/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

Volume : I Issue : XVIII April-June 2017



ARTS | COMMERCE | SCIENCE | AGRICULTURE | EDUCATION | MANAGEMENT | MEDICAL | ENGINEERING & IT | LAW | SOCIAL SCIENCES | PHYSICAL EDUCATION | JOURNALISM | PHARMACY

Editor

**Sarkate Sadashiv Haribhau**

Email : powerofknowledge3@gmail.com, shsarkate@gmail.com

www.powerofknowledge.co.in

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | A Study of Human Development Index | Dr. V. S. Kshirsagar | १ |
| २ | ROLE OF ENTREPRENEURS IN THE BUSINESS | Dr. Subhash. K. Zinjurde | ४ |
| ३ | Advertisements Restore Values: A Case Study of EightTelevision Advertisements in Indian Perspective | Mr.Sheshrac K. Rathod | ९ |
| ४ | A STUDY OF PRESENT SCENARIO OF GST | Dr. Atul H. Salunke | १९ |
| ५ | PROBLEM & POLICIES OF INDIAN AGRICULTURAL SECTOR | Dr. Subhash. K. Zinjurde | २५ |
| ६ | Government of Maharashtra and women empowerment with reference to Mahila ArthikVikasMahamandal (MAVM) | Mrs. Savita Bhausaheb Nage | ३० |
| ७ | 'ग्रामगीतामृतम्' या ग्रंथातील विषय वैविध्य | सौ.अर्चना देवगिरीकर | ३३ |
| ८ | 'शिक्षाशास्त्राचा इतिहास व स्वरुप' | सौ.सुवर्णा कुलकर्णी | ३५ |
| ९ | महाभारतातील उपाख्याने | सौ.गार्गी पुरुषोत्तम व्यवहारे | ३८ |
| १० | नागनाथ कोत्तापल्ले यांच्या कथेतील समाजजीवन | प्रा.नाना झोडगे | ४० |
| ११ | काव्य हाच दलित साहित्याचा पहिला अविष्कार | प्रा.नामदेव शिनगारे | ४८ |
| १२ | भीमगीतांचा समाजजीवनावर झालेला परिणाम | प्रा.प्रताप गायकवाड<br>प्रा.डॉ.प्रभाकर कांबळे | ५२ |
| १३ | लोकसाहित्यातील विनोदाचा शोध | प्रा.अर्चना रामचंद्र चव्हाण | ५५ |
| १४ | मराठी विडंबन काव्य | प्रा.सुखदेव इघारे | ६० |
| १५ | केशव बा. वसेकरांचे ललित वाङ्मय - एक आकलन | प्रा.पसरकल्ले एस.पी. | ६५ |
| १६ | ग्रामीण कथेतून व्यक्त होणारे ग्रामजीवनाचे अंतरंग | प्रा. डॉ. संतोष विष्णू चतुर | ६८ |
| १७ | विमुक्तांच्या संवेदनेची कणव : केसूला | प्रा.व्ही.बी.राठोड | ७३ |
| १८ | भारतातील स्त्री पुरुष गुणोत्तरातील असमतोल एक समस्या विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य | सुधाकर श्रीराम हांगे<br>प्राचार्य डॉ. व्ही.जी. सानप | ८० |
| १९ | परिवर्तनाचे सृजन -अखंड | डॉ. रमेश विठ्ठलराव देवडे | ८५ |
| २० | मराठी आक्ष्यायिकांचे स्वरुप व वेगळेपण | डॉ. शंताराम बबनराव चौधरी | ८९ |
| २१ | कृषी संस्कृतीतील स्त्री लाकगीते देशीयतेच्या पाऊलखुणा | डॉ. नानासाहेब पवार | ९५ |
| २२ | भारतीय जीवन में संस्कारो का स्थान | मनिषा राकेश कात्त्यायनी | १०१ |
| २३ | डॉ. जयंत विष्णु नारलीकर की विज्ञानकथा धूमकेतु | डॉ. बी. आर. नळे | १०४ |
| २४ | राष्ट्रवाणी के संगाष्टी विशेषांक (आधुनिकता के संदर्भ में हिंदी साहित्य) | प्रकाश गायकवाड | १०८ |

| | | | |
|---|---|---|---|
| २५ | जलयुक्त शिवार अभियान : एक दृष्टीक्षेप | प्रा. सोमेश्वर नारायण बाबर | १११ |
| २६ | लोकसंख्या धोरण (Population Policy) | प्रा. डॉ. सोंडगे ता.प. | ११५ |
| २७ | महादजी शिंदे व गुरु मन्सुरशहावली | प्रा.डॉ.सावंत के.डी | १२३ |
| २८ | डॉ.आंबेडकरांचे लोकशाही चिंतन : | प्रा.पोटभरे एस.डी. | १२५ |
| २९ | अरुण कोलटकरांच्या 'द्रोण' या कवितासंग्रहातील कवितेचा रुपबंध | डॉ.वैजयंतीमाला जाधव | १२८ |
| ३० | कलाव्यवहार आणि प्रयोगशीलता | गजानन अपिने | १३२ |
| ३१ | लोकसाहित्याचे स्वरुप व संकल्पना | प्रा. देठे मीरा माधवराव | १३७ |
| ३२ | मराठी ग्रामिण लेखिकांच्या काही कथांमधील प्रतिमा - प्रतिके | डॉ. नानासाहेब पवार | १४१ |
| ३३ | भावस्पर्शी संवादात्मक कादंबरी : धम्म सांगती बाबा | डॉ.सुरेश पैठणकर | १४४ |
| ३४ | मानवी जीवनातील अटळ सत्याची सौंदर्यवादी कविता 'बेट बंद भावनेचे' | प्रा.डॉ.शोभा इं.रोकड | १४८ |
| ३५ | प्रयोजनमूलक हिंदी : स्वरुप तथा विविध रूप | प्रा. डॉ. जयंत बोबडे | १५० |
| ३६ | डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानाचे प्रतिक | कु. गोरे स्वाती लक्ष्मणराव | १५५ |
| ३७ | २००० नंतरच्या आत्मकथनातील स्त्री जीवनाचा शोध | प्रा. डॉ. सौ. संगीता जी. घुगे<br>प्रा. सौ. कांबळे सुनिता शंकरराव | १६० |
| ३८ | सामाजिक सुधारणानंतरची भारतीय स्त्री : एक विश्लेषण | प्रा. डॉ. आनंद शिंदे | १६३ |
| ३९ | १९८० नंतरची ग्रामीण कथा | प्रा. शिवाजी सिरसाठ | १६९ |
| ४० | स्वराजाची सुरक्षा व आरमार | डॉ.भांगे चंद्रकांत बन्सीधर | १७२ |
| ४१ | अवर्षणाची कारणे व परिणाम | श्री बिरादार श्रीकृष्ण दिगंबर | १७६ |
| ४२ | आंतरराष्ट्रीय राजकारण आणि पर्यावरण | प्रा.डॉ.मानवते उत्तम हुसनाजी | १८१ |
| ४३ | A Study of Performance and Evaluation of Public Distribution System in India "With Special reference to Maharashtra State" | Dr. D. B. Kharat<br>Mr. B. N. Pimple | १८४ |
| ४४ | Bacon's Essays : The Finest Intellectual Feast | Dr. Jugal Tayde | १९१ |
| ४५ | सुलभा भागगांवकर यांची कथा : भाषिक व वाड्:मयीन वैशिष्टये | प्रा.डॉ.फुला बागुल<br>हर्षदा पुराणिक | १९४ |
| ४६ | धग (उध्दव शेळके) | प्रा.डॉ. भैरगुंडे एस्.एस. | २०१ |

# अरुण कोलटकरांच्या 'द्रोण' या कवितासंग्रहातील कवितेचा रुपबंध

डॉ.वैजयंतीमाला जाधव

अरुण कोलटकरांचा 'द्रोण' हा कवितासंग्रह इ.स.२००४ मध्ये रीतसर प्रकाशित झाल. इ.स. २००३ मध्ये ही कविता ाजगी वितरणासाठी छापली गेली होती. 'द्रोण' या संग्रहातील कवितेचा रुपबंध हा आधीच्या तीनही कवितासंग्रहापेक्षा वेगळा आहे. (अरुण कोलटकरच्या कविता, भिजकी वही,) कवीने कवितांच्या सुरवातीलाच याला 'सर्ग' असे संबोधले आहे.

उदा.

'हे सर्ग
वाल्मिकी रामयाणाच्या कोणत्याही पाठात आढळत नाहीत.'

प्रस्तुत कवितासंग्रहातील कविताची एकूण पाच भागात रचना केली गेली आहे. आणि या पाच भागात वेगवेगळ्या सूत्रानुसार कवितेची रचना केलेली आढळते. रामकथेवर आधारीत अशी ही दीर्घकविता वाचकाला प्राचीन कालखंडात नेतेच, पण यमकाळाशी तिचे जोउलेपण तितक्याच प्रकर्षाने जाणवते. प्रस्तुत कवितेमध्ये रामायणातील रामविजयाच्या तथाकथित प्रसंगाला हाताशी घेऊन पुन्हा नव्याने त्याची जुळणी करण्याचा प्रयत्न कोलटकरांची कविता करते, 'द्रोण' चा संपूर्ण बाज हा कथात्म कवितेचा आहे. एकूण पाच सर्गाची योजना असणारा कवितेमध्ये वापरलेला निवेदनाचा हा रुपबंध आधीच्या कवितांपेक्षा त्यांचे वेगळेपण स्पष्ट करतो. रुपबंधाच्या दृष्टीने त्यांच्या कवितेतील वेगळेपण पुढीलप्रमाणे सांगता येते.

१) निवेदनात्मकता
२) नाट्यात्म प्रसंगनिर्मिती
३) निखळबोलीभाषेचा वापर
४) प्रत्ययकारी वातावरणनिर्मिती
५) बंदिस्त काव्यरचना इ. विवेचन

कोलटकरांच्या 'द्रोण' या कवितांसग्रहातील कवितांचे महत्वाचे वेगळेपण म्हणजे, या कवितांमध्ये जाणवणारी गद्यात्मता हे आहे. कवितेच्या रचनेमध्ये अंतभूर्त असणारी एक विशिष्ट प्रकारची लय या कवितांमध्ये अस्तित्त्वात नाही. मात्र भाषेचा एक सलगपणा, प्रवाहीपणा या कवितेच्या शब्दातून प्रगट होतो. गद्यात्मकतेच्या, कथनात्मकतेच्या चौकटीत मोडणारी ही कविता तिची अंतर्गत लय मात्र टिकवून ठेवताना दिसते. रामकथेला कल्पक वळण देऊन कोलटकर माकडापासून उत्त्कांत झालेल्या माणसाचे आणि परत त्याच्या माकड होण्याच्या प्रवासाचे अतिशय उपरोधिक अंगाने आपल्या कवितेतत वर्णन करतात.

कवी आपल्या कवितेतून भूतकाळात घडलेल्या या घटनेचे वर्णन मात्र आधुनिक काळाशी जोडून करताना दिसतो. रामायणामध्ये आलेल्या राम, सीता, रावण या सर्वच व्यक्तिरेखा अधिक व्यापक अर्थाने कवी रेखाटतो. प्रस्तुत कवितेतील साऱ्या घटना या सीता, वानर यांच्याभोवती आकार घेताना दिसतात. .
आपल्याला आलेल्या अडचणीसाठी वानरांनी सीतेकडे जाणे, सीतामाईचा प्रेमळ सल्ला या साऱ्या घटना वर्तमान मानवी जीवनसरणीचा प्रत्यय आणून देतात.

'द्रोण' मधील या सर्व कथाभागाला पद्यात मांडून रचनाबंधाचा एक वेगळाचा नमुना वाचकासमोर कवी आणतो. मुळातच दीर्घ कवितेच्या रचनाबंधाकडे कोलटकरांची कविता पुन्हा वळताना दिसते. संपूर्ण कवितेमधून कवी एक कथाच

सांगत आहे. रामविजयानंतर रामाने दिलेली पार्टी, त्यात वानरांचा राक्षसांचा सहभाग सीतामाइ्रचा वानरांना सल्ला, वानरांचे द्रोणापासून निर्माण झालेल्या गलबतातून स्थलांतर अशा विविध घटना ही कविता कथन करते. 'द्रोण' ही एक प्रकारची पद्यात्मक कथाच आहे. तिचे वळण भावकवितेचे नाही.

यामधील निवेदक हा अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. तो याठिकाणी कथन करतो. कथनात्मक साहित्यामध्ये महत्त्वाचा ठरणारा हा निवेदक सर्व घटनाक्रम अतिशय तटस्थपणे कथन करतो आहे. "कथनात संहिता निवेदकाच्या 'आवाजात' सांगितली जाते. निवेदकाचे सर्वात महत्त्वाचे कार्य कथा सांगणे हेच असते. पण या कार्याशिवाय कथनात्म संहितेची आंतरिक जुळणी करणे, आपल्या परिभाषितामधून श्रोत्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न करणे, कथेचे स्वतःबरोबर संबध स्पष्ट करीत जाणे, कथेला विशिष्ट वैचारिक भूमिका प्राप्त करुन देणे यासारखी कार्येही निवेदकाकडून केली जातात," द्राण' मधील कथानकाचे कथन करत असताना त्यातील वेगवेगळ्या घटनांची निवेदक स्वतःच्या पध्दतीने कालक्रमव्यवस्था लावत आहे. या कथेमध्ये घडणाऱ्या वेगवेगळ्या घटनांचे निवेदन करत असताना त्याची स्वतःची एक मूल्य दृष्टीही आहे हे कथेतील निवदनावरुन स्पष्ट होते.

उदा. निव्वळ माणूस म्हणून
जगूच शकत नाही तुम्ही या जगात (पृ.३२)

समाजात जगत असताना निव्वळ माणूस म्हणून जगणे अवघड आहे. आणि वानरांनी माणूस म्हणून जगायचे ठरल्यावर त्यांना नेमके 'काण' व्हायचे आहे ठरवणे महत्त्वाचे आहे. असे निवेदक म्हणतो. कारण त्याच्या मते, माणूस म्हणजे माकडाचा अपभ्रंश आहे.

याठिकाणी निवेदक केवळ स्वतःचा दृष्टीकोन कथेत व्यत्क करुन थांबत नाही. तर इतर पात्रामधील संवादाचे काही प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जे कथन केले ओ त्याचेही वर्णन तो करतो आहे. यामध्ये सीता, वृध्द कपी, इतर काही वानर यांचाही समावेश आहे. या सर्व घटना वेगवेगळ्या स्वरुपाच्या आहेत. यातील काही घटना या वानरांच्या, माणसांच्या बाह्यविश्वाशी संबधित आहेत. रामाने विजयाबद्दल दिलेली पार्टी, त्यामधील गमतीजमती, सीतेने दिलेल्या द्रोणांची झालेली गलबते, त्यातून देशोदेशी झालेले स्थलांतर या घटनांचा यात सामावेश आहे. तर मानवी स्वभावाचे वेगवेगळे पैलू, त्यांच्या अंर्तमनातील गोष्ट यांचे वानरांना वाटणारे कुतूहल, मानवी वर्तनाविषयी त्यांना पडणारे प्रश्न अशा अंर्तविश्वातील घटनांचाही येथे सामावेश झाला आहे. माणसांसारखं दोन पायानी चालणं, नुसत चालणंच नव्हे तर एका पायापुढं दुसरा पाय क्रमान टाकणं, माणसांनी त्यांच्या सोयीसाठी घालून दिलेले वाहतुकीचे नियम पाळने, रस्ता ओलांडताना डावी-उजवीकडे पाहणे या गोष्टी वानराना विनोदी वाटतात. शिवाय माणूस डोकेबाज, कल्पक आहे. पण त्यांची कल्पकता आपला दुबळेपणा झ ााकण्यात जात. एका झेपेत नदी पार करता येत नसल्याने मानवाने नौका शोधली, समोरासमोर हात करण्याची हिम्मत नसल्याने त्याने धनुष्यबाण वापरायला चालू केला. वेगवेगळ्या स्वरुपाच्या घटना विशिष्ट आशयसूत्रामध्ये, संगतीने याठिकाणी गुंफलेल्या आहेत.

कथात्म साहित्यातून कथन केला जाणाऱ्या घटना या भूतकाळातील असतात. 'द्रोण' मधील कथन केलेल्या सर्व घटना या भूतकाळातील आहेत. त्या घडून गेलेल्या आहेत. त्यामुळे त्यांच्यामध्ये समृतीसदृश्य अनुभवांच्या नाट्यात्मकतेबरोबर या कवितेततील घटनांना अद्‌भुताचा स्पर्श झालेला दिसतो. वानरांना सीतामाईने द्रोण देणे, या द्रोणांची मोठमोठी गलबते होणे त्यातून वानरांनी वेगवेगळया देशात स्थलांतर करणे आणि नवनवीन वसाहतीची स्थापना होणे हे सारे कवीने अतिशय कल्पकतेने मांडले आहे. वानराला शंखाने सुरस आणि चमत्कारित गोष्टी सांगणे 'द्रोण' मधील कवीने निर्माण केलेला अनाम निवेदक वेगवेगळया हकीगतीचे निवेदन करत आहेच पण निवेदना बरोबर येणारा कथनाचा भागही वैशिष्टयपूर्ण आहे.

"कालानुक्रम, कार्यकारणभाव, साहचार्यत्व यासारख्या संघटनतत्वानुसार गुंफलेल्या घटनांचा विशिष्ट क्रमव्यवस्थेचा निदर्शक म्हणून येणारा कथनाचा भूतकाळ हे कथात्म साहित्याचे वैशिष्टय होय. सुसान लॅंगर या समीक्षीकेने त्याला प्रतिभासिक भूतकाळ' (व्हर्च्युअल पास्ट) असे म्हटले आहे. कारण हा भूतकाळ प्रत्यक्ष वास्तवाला नसतो. या विशिष्ट भुतकाळामुळे कथात्म साहित्य नाटयात्म व भावकाव्यात्म साहित्यप्रकारापासुन वेगळे पडते." 'द्रोण' मधील घटना वेगळया आहेत. द्रोण मधून कथन केलेल्या घटनांचे महत्तवाचे एक वैशिष्टय म्हणजे त्यातील नाटयत्मकता होय. रंगभूमीवर घडणाऱ्या एखाद्या विशिष्ट प्रयोगापमाणे द्रोण मधील घटना आकार घेताहेत. वानरांना मानवयोनीतच रहावेसे वाटणे, रामाने विजयाबद्दल त्यांना पार्टी देणे, वानरांचे सीतामाईला भेटणो तिने दिलल्या द्रोणांचे गलबते होणे या सर्व घटना रंगभूमीवर साकार होत आहेत. असे वाटते. कवितेतील पात्रे ही परिस्थितीनुसार आपली मतेही मांडत आहेत. त्यामुळे याठिकाणी प्रत्यक्ष संवादच चालू आहे असा आभास उत्पन्न होतो.

या संवादाच्या अर्थीचा पल्ला रामायणकालीन वास्तवाचा आभास उत्पन्न करता करता ती कक्षा ओलांडुन वर्तमान जीवनसरणीचा प्रत्यय आणून देतो. या कवितेतील प्रत्येक शब्दाला जसे अर्थमुल्य आहे तसे एकंदर रचनाबंधाला शब्दबंधासकट दृश्यमुल्यही आहे. या पार्टीच्या निमित्ताने होणाऱ्या स्पार्धातील उदाहरणादाखल विजेत्यांना पारितोषिके देण्यासाठी लंकेच्या कोषागारातुन बाहेर आलेल्या मौल्यवान वस्तू किंवा माणूस व वानर यांच्या खाली उतरण्यातला सांगितेला फरक जरी पाहिला तरी एकंदर कवितेच्या दृश्यात्मक अंगाचे सामर्थ्य स्पष्ट होऊ शकेल. कोलटकरांच्या एकूणच कविताकडे पाहता त्यांच्या कवितेला दृश्यत्वाचे असलेले परिमाण याही कवितावरुन लक्षात येत. वेगवेगळया घटनांचे कोलटकर एवढया ताकदीने प्रकटीकरण करतात की त्यामुळे त्याचे दृश्यरुप डोळयासमोर लगेचच उभे राहते.

उदा.

तेवढयात जमीन हादरली,
आणि तो उडालाच एकदम, म्हणजे
अक्षरशः
गेला आकाशात उंच
एखाद्या निखळत्या ताऱ्याच्या वेगानं,
पण उलटया दिशेनं (पृ.७९)

'निखळता तारा' वेगाने खाली येण्याची क्रिया कोलटकर वेगळया संदर्भात वापरतात. वेगवेगळया क्रिया, दृश्यप्रतिमांचे अद्यहत संदर्भ वेगवेगळया क्रियांच्या संदर्भात अतिशय चपखलपणे वापरतात. काही ठिकाणी त्यामागील उपरोधही अतिशय स्पष्टपणे लक्षात येतो. माणूस म्हणजे माकडाचा अपभ्रंश असणे', दुसरे एखाद्या जनावराचं दूध प्यायल्यामुळे माणसाच्या पिलाची मानसिक वाढ खुरटणे, कुंडलिनीचे बिथरणे, सीतेच्या शुध्द चारित्र्याबद्दल अग्नीने तिलाप्रमाणपत्र देणे, रामाच्या भावी राजव्यवस्थेचा 'चातुवर्ण्य' हा कणा असणं या सगळयामागे एक जो उपरोध आहे, त्या उपरोधाने समकालीन व्यवस्थेचा मर्यादांवर बोट ठेवले आहे. 'चिरीमिरी' मध्ये येणाऱ्या काही कवितामध्येही कवी उपरोधिक अंगाने समकालीन व्यवस्थेच्या गुण-दोषांना अधोरेखित करताना दिसतो. 'द्रोण' मधील कवितेमध्ये येणारी भाषा ही वेगवेगळया स्वरुपाची आहे. कधी औपचारिकपणे यातील घटनांचे कथन केले गेले आहे. तर कधी निखळ बोलीभाषेचा वापर केलेला दिसतो. मराठी, संस्कृत आणि इंग्रजी भाषेतील विपुल पध्दतीने वापन याठिकाणी झालेला दिसतो.

उदा.

आणि पुढं तो शंख
असंही म्हणाला त्याला

की अरे यार,
सीतामैयाचे आशीर्वाद
संगती असल्यावर
दुसंर काय पायजेल तुम्हाला ? (पृ.७२)

दैनंदिन बोलीभाषेतील शब्दांचा, वाक्यरचनेचा अतिशय सहजपणे वापर करत वास्तवाची वस्तुनिष्ठ पध्दतीने मांडणी करण्याचे कवीचे कौशल्य नोंद घेण्यासारखे आहे.

पार्टी, आयटेम, मेनू, टाइट, बारवाला, हायटेक, माय गॉड, बेटा, हायटेक अशा वर्तमानव्यवस्थेतील शब्दसंग्रहाचा उपयोग ही कविता करते. त्याबरोबरच, अस्मात-कस्मात वगैरे सारख्या संस्कृत शब्दांचे उपयोजन कोलटकरांची कविता नेमकेपणाने करते.

समारोप :-

रुपबंधाच्या दृष्टीकोनातून विचार करता 'द्रोण' ही दीर्घ स्वरुपाची कथात्म कविताच म्हणता येईल. प्राचीन महाकाव्याच्या धर्तीवर, द्रोणमध्ये केलेली वेगवेगळी सर्गाची रचना, प्रत्येक सर्गामध्ये वेगवेगळया पण एकाच धाग्याने जोडलेला कथाभाग, प्रसंगी अद्‌भुताचा केलेला वापर या साऱ्यामुळे कवितेचा आकृतिबंध अधिकच चिरेबंद झाला आहे. व भावकवितेच्या वळणापेक्षा 'द्रोण' मधील कविता सर्वस्वी निराळी आहे. तिच्यामधील गद्यात्मक फॅटसीचा वापर, प्रभावी व्यक्तिचित्रण, नाटयात्म प्रसंगनिर्मिती यामुळे ती अधिक प्रयोगशील बनली आहे. एका काळामध्ये घडुन गेलेल्या घटनेचे दुसऱ्या काळामध्ये वर्णन करताना (राम विजयाच्या प्रसंगाचे आधुनिक काळामध्ये) त्यात कवीने जो तोल सांभळला आहे तो नोंद करण्यासारखा आहे. या तोलामुळे या संग्रहातील कोणतीही व्यक्तिरेखा, किंवा प्रसंग उपरा वाटत नाही. वानर आणि माणूस यांच्या भावजीवनातील सूक्ष्म फरक, वर्तमानकालीन माणसाचे भौतिक जगणे या साऱ्याला कोलटकरांची कविता अतिशय सुक्ष्मपणे अधोरेखित करते. पारंपारिक वाङ्मयाच्या इतिहासामध्ये आलेल्या 'रामा'च्या व्यक्तिरेखेला कोलटकर मात्र याठिकाणी वेगळे वळण देतात. रामाराज्यातील चातुवर्ण्यव्यवस्थेची पध्दत, सीतेला शुध्द असण्याचे अग्निने दिलेले प्रमाणपत्र, माणसाचे इतर जनावराचे दूध पिण्यामागची कारणमीमांसा हे सारे अतिशय उपरोधिकपणे कोलटकर मांडतात.

केवळ कथा सांगून याठिकाणी ते थांबत नाहीत तर त्यातील मार्यादाही ते उघडया करतात. कोलटकरांच्या प्रस्तुत कवितेचा रुपबंध हा त्यांच्या इतर चारही कवितासंग्रहामधून येणाऱ्या कवितेपेक्षा अतिशय भिन्न स्वरुपाचा आहे आणि त्यामुळेच तो अतिशय महत्वाचा वाटतो.

**संदर्भ :-**

१. खोले, विलास, द्रोण, तारका (दिवाळी), (संपा.माधव चव्हाण) वर्ष ११, अंक ३६, पृ.७०)

❖❖❖❖